देशोन्नती

# स्टेट बँक शाखा समुद्रपूरचे वतीने आज वित्तीय समावेशन शिबिराचे आयोजन

देशोन्नती वृत्तसंकलन

**समुद्रपूर** : भारतीय स्टेट बँक शाखा समुद्रपूरचे वतीने लसनपूरसाठी वित्तीय समावेशन शिबिराचे आयोजन सोमवार (ता. २५ ) ऑगस्टला दिपाली कम्प्लेक्स समुद्रपूर येथे करण्यात आले आहे.

सदर शिबिरामध्ये पीएमजेडीवाय अंतर्गत खाते उघडणे, निष्क्रिय असलेले खाते ते सक्रिय करणे , रूपे कार्ड वितरण करणे व सक्रिय करणे , पीएमजेजेबिवाय व पीएमएसबीवाय विमा नोंदणी करणे, अटल पेन्शन योजना नोंदणी करणे, किसान क्रेडिट कार्ड व स्वयं-सहायता गट जोडणी करणे, डिजिटल बँकिंग, मोबाईल बँकिंग कशी करणे याबाबत मार्गदर्शन करणे. आदी शिबिरामध्ये करणार असल्याचे शाखा व्यवस्थापक विशाल धनविजय यांनी सांगितले.


Powered by: erelego.com